ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादी विषयांस वाहिलेले प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारी प्रसिद्ध होते.

वार्षिक वर्गणी : ६ रु.


टेलि. ५५६२७

दुर्गाधिवास, पुणे ४

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT

Reg. No. B. 80. Licence No. 175

वर्ष ३१ पुणे, बुधवार २० जुलै, १९६६ अंक १४



# विविध माहिती

**साखरेचे साठे व टंचाई**—श्रीरामपूर तालुक्यातील साखरेच्या कारखान्याच्या गुदामातून साखरेचा साठा तुंबून राहिला आहे. गेल्या वर्षापेक्षा ह्या वर्षी साठ्याचे प्रमाण ३० ते ४० टक्क्यांनी तरी अधिक आहे. पण श्रीरामपुरांत मात्र साखरेचे दुर्भिक्षच आहे. गेल्या महिन्यांत ह्या भागांतील साखरेच्या शिध्याचे प्रमाण कमी करण्यात आले आहे. उसाची शेती करणाऱ्या शेतकऱ्याला सकाळचा चहा गुळाचा घ्यावा लागत आहे. अधिक साखर खुली करण्यात यावी अशी मागणी कारखाने करीत आहेत.

**जपानची लोकसंख्या १० कोटींपेक्षा अधिक**—जपानमधील लोकसंख्या १० कोटींच्याही वर गेली असल्याचे अधिकृतरीत्या सांगण्यात आले आहे. पूर्वी करण्यात आलेल्या गणनेपेक्षा ही संख्या १.०७ टक्क्यांनी अधिक आहे. जपानमधील मोठ्या शहरात लोकसंख्या एकसारखी केंद्रित होत चालली आहे. एकूण लोकसंख्येपैकी निम्म्याहून अधिक लोकसंख्या टोकिओ, ओसाका, इत्यादी ह्या प्रचंड शहरांतून एकवटलेली आहे.

**ग्रामीण भागासाठी रेडिओ**—भारत सरकारचे माहिती व नभोवाणी खाते ग्रामीण भागांसाठी स्वस्त किंमतीचे ६,००० रेडिओ पुरविणार आहे. सधन शेतीसाठी निवडण्यात आलेल्या १६ जिल्ह्यांतील खेड्यांतून ते देण्यात येतील. रेडिओवरून शेतीविषयक कार्यक्रम ऐकून शेतीच्या आधुनिक तंत्राचा उपयोग करण्यास शेतकऱ्यांनी शिकावे म्हणून हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. रेडिओंची किंमत ४ लाख रु. असून ते संयुक्त राष्ट्रसंघटनेने देणगी म्हणून पुरविलेले आहेत.

**मुंबईमधील पाणीपुरवठा**—मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या तलावातून पर्जन्याच्या अपुरेपणामुळे पुरेसे पाणी साठलेले नाही. त्यामुळे शहराच्या पाणीपुरवठ्यात हळूहळू कपात करण्यात आली. पाणीपुरवठा अपुरा होत असल्यामुळे शहरातील विहिरी खुल्या करण्यात आल्या. मुंबई शहरात व त्याच्या उपनगरांत मिळून सुमारे ७ हजार विहिरी आहेत. पाण्याचे दुर्भिक्ष कमी करण्यासाठी त्यांचा अंशतः उपयोग होऊ शकेल.

**कुत्री चावल्याने मृत्यु**—नागपूर कॉर्पोरेशनच्या हद्दीत गेल्या वर्षी पिसाळलेली कुत्री चावून २९ माणसे मरण पावली. नागपूर शहरांत भटक्या कुत्र्यांची संख्या अलीकडे वाढलेली आहे. ह्या कुत्र्यांचा बंदोबस्त करण्याची खास मोहीम आता कॉर्पोरेशनने सुरू करण्याचे ठरविले आहे.

**बँकाक येथील व्यापार प्रदर्शन**—आशिआ खंडा पहिले आंतरराष्ट्रीय व्यापार प्रदर्शन बँकाक येथे येत्या नोव्हेंबरपासून भरविण्यात येणार आहे. ते १० डिसेंबरप चालणार आहे. प्रदर्शनात सुमारे ४० देश आपापला म मांडणार आहेत. त्यात औद्योगिक प्रगतीत आघाडीवर असले देश आहेत. आशिआतील देशांत व्यापार वाढविण्याचा प्रद नाचा हेतू आहे. भारत प्रदर्शनात सामील होणार आहे.

**आधुनिक पावभट्ट्यांची उभारणी**—भारत सरका अद्ययावत यंत्रसामग्री वापरण्यात आलेल्या पाव भाजण्याच्या भट्ट्या उभारण्याचे ठरविलेले आहे. त्या सार्वजनिक मालकी विभागात असतील. पहिली भट्टी बहुधा मद्रास येथे उभारण येईल. बाकीच्या कोचीन, अहमदाबाद, मुंबई, कलकत्ता व दि ह्या ठिकाणी स्थापन करण्यात येतील. सर्व भट्ट्या चालू झा म्हणजे ४०० ग्रॅम वजनाच्या ३ लाख पावरोट्या रोज भाजण्य येतील.

**कोलंबोच्या महत्त्वाला धोका**—सिलोन आणि भा ह्यांच्या दरम्यान असणाऱ्या पाकच्या सामुद्रधुनीची खो वाढविण्याचा विचार भारत सरकार करीत आहे. ही योज अमलात आली तर कोलंबो ह्या बंदराचे महत्त्व उतरणी लागण्याचा संभव आहे. कोलंबो हे आंतरराष्ट्रीय समुद्रमा वरील एक महत्त्वाचे बंदर आहे. पण, सामुद्रधुनी खोल करण्य आल्यास मोठ्या बोटी कोलंबो बंदराला न लागता आप प्रवास जवळच्या मार्गाने करू शकतील.

**रशियाची गव्हाची खरेदी**—कॅनडा व रशिया ह्यांच्या दरम्य गहू व आटा पुरविण्याचा करार करण्यात आला आहे. त्यात शर्तीप्रमाणे कॅनडाने येत्या ३ वर्षांत रशियाला ३३.६ को बुशेल गहू व कणीक पुरविण्याचे कबूल केले आहे. ह्या पुरवठ्या साठी रशियाला ८० कोटी डॉलर्स किंमत मोजावी लागे आंतरराष्ट्रीय व्यापारात एवढा मोठा सौदा एकदम झाल्याचे पहिलेच उदाहरण मानण्यात येत आहे.

**सतारिआची लोकप्रियता**—सुप्रसिद्ध हिंदी सतारवा रविशंकर व प्रसिद्ध तबलापटू अल्लारखा सध्या ब्रिटनच्या दौऱ्य वर आहेत. एडिंबरो येथे त्यांचा अलीकडेच एक कार्यक्र झाला. कार्यक्रम अतिशय लोकप्रिय झाला. श्रोत्यांची एवढी ग झाली होती की एकही जागा रिकामी नव्हती. ब्रिटनम सतारवादनात रस घेणारे श्रोते वाढत आहेत.


**सुरक्षित ?** होय. संग्रही पैसा असला म्हणजे आपण सुरक्षित व समाधानी असता, हे काही आम्ही नव्याने सांगायला नको. इच्छा असूनही बचतीची सुरुवात कशी करावी या संभ्रमांत आपण असाल तर नजीकच्या बेळगाव बँकेच्या शाखेची वाट धरा. ही "तुमची बँक" बचतीची संचय आकर्षकरीत्या कशी ठेवावी हे तुम्हांला सांगेल. तुमच्या सेव्हिंग्ज अकौंटवर आणि मुदतबंद अगर क्युमिलिटिव्ह ठेवींवर आकर्षक व्याज आणि इतर सवलतीबद्दल तुम्हांला आस्था असणारच. त्यासाठी एकवार भेटाच.

*** दि बेळगांव बँक लिमिटेड ***

शेड्यूल्ड बँक ] [ स्थापना : १९३०

**महाराष्ट्र, म्हैसूर राज्य व गोवा येथे ३८ शाखा**

आपल्या नजीक असलेल्या आमच्या शाखेला आजच भेटा.

मुंबई शाखा : नरसीनाथ स्ट्रीट, मांडवी, मुंबई-९.

# अर्थ

बुधवार, २० जुलै, १९६६



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## नियंत्रणे शिथिल करण्याची सूचना

गेल्या फेब्रुवारी महिन्यात जयपूर येथे भरलेल्या काँग्रेस पक्षाच्या अधिवेशनात शिफारस केल्याप्रमाणे काँग्रेसचे अध्यक्ष श्री. कामराज ह्यानी देशातील आर्थिक परिस्थितीचा अभ्यास करण्यासाठी एक कमिटी नेमली आहे. फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री ह्या संघटनेने कमिटीकडे एक निवेदन पाठवून आपले म्हणणे मांडले आहे. फेडरेशनच्या मताने औद्योगिक प्रगतीचा वेग वाढविण्यासाठी उद्योगधंद्यांवरील नियंत्रणे आणि निर्बंध काही प्रमाणात शिथिल करण्यात आले पाहिजेत. जे उद्योगधंदे शेतीच्या विकासाला पूरक आहेत, किंवा जे देशाच्या निर्यातीच्या व्यापाराला मदत करतात किंवा जे पूर्वी आयात होणाऱ्या आवश्यक वस्तूंसाठी पर्यायी वस्तू वापरत आहेत अशा उद्योगधंद्यांच्या बाबतीत तरी नियंत्रणे सैल करणे फार आवश्यक आहे. निवेदनात पुढे असे म्हटले आहे की, औद्योगिक वाढ होण्यासाठी शेतीचा विकास होणे अत्यावश्यक आहे. हे जरी खरे असले तरी शेतीचा विकास हाही उद्योगधंद्यांच्या प्रगतीवर अवलंबून आहे. रासायनिक खते, कीडनाशक औषधे, यंत्रचलित नांगर, शेतीची यांत्रिक अवजारे, पाणी उपसण्याची एंजिने व पंप, इत्यादी अनेक गोष्टी शेतीच्या विकासासाठी जरूरीच्या असून त्यांची निर्मिती कारखान्यांतूनच होत असते. ह्या वस्तूंचा नियमित पुरवठा शेती विभागाला झाला नाही तर शेतीचा विकास अडून राहिल्याशिवाय राहणार नाही. थोडक्यात म्हणजे, शेतीचा विकास आणि औद्योगिक वाढ ह्यांचे संबंध एकमेकांशी इतके जोडलेले आहेत की एका विभागाची भरभराट दुसऱ्या विभागाच्या भरभराटीशी संलग्न आहे. म्हणून नियंत्रणे व निर्बंध ह्यांचा वापर सैल करणे आवश्यक असेल तर तसे करण्यास कचरण्याचे कारण नाही.

## परदेशीय हौशी प्रवाश्यांपासून मिळणारी हुंडणावळ

भारताला परदेशीय चलन मिळवून देणारा अनेक प्रकारचा निर्यात माल आहे. ह्या मालाच्या निर्यातीत वाढ करणे सहज शक्य होणारे नाही. परंतु, परदेशीय प्रवाश्यांपासून मिळणारे परदेशी चलन वाढविणे मात्र काही प्रमाणात तरी प्रयत्नसाध्य आहे. ह्या दृष्टीने अखिल भारतीय प्रवास विकास मंडळाने केलेल्या काही सूचना उपयुक्त आहेत. मंडळाची १० वी बैठक म्हैसूर येथे भरली होती. बैठकीने अशी सूचना केली आहे की, हौशी प्रवाश्यांचा धंदा हा निर्यातवाढीचा एक प्रमुख धंदा म्हणून मानण्यात यावा आणि निर्यातीच्या दृष्टीने अग्रेसर असलेल्या इतर धंद्यांच्या बरोबरीचे स्थान त्याला देण्यात यावे. भारताला आपली निर्यात वाढविण्याची सध्या अतिशय गरज असल्याने निर्यात मालाच्या धंद्यांना अनेक सवलती सरकारमार्फत देण्यात येत असतात. आर्थिक मदत, जमीन मिळवून देणे, विजेच्या पुरवठ्याची सोय करणे, पाण्याचा पुरवठा करणे, करांबाबत सवलती देणे, इत्यादी अनेक बाबतीत ह्या धंद्यांना साह्य करण्याचे सरकारचे धोरण असते. तसेच धोरण हौशी प्रवाश्यांच्या धंद्याबाबत स्वीकारण्यात यावे अशी मागणी मंडळाने केली आहे. भारतात येणाऱ्या परदेशीय प्रवाश्यांची संख्या वाढत चालली आहे. पण त्यांना प्रवासात मिळणाऱ्या सवलती अपुऱ्या आहेत. त्या वाढविण्यासाठी अधिक परदेशीय चलन देण्यात यावे अशीही विनंती मंडळाने केली आहे. भारतामधील ह्या परदेशी प्रवाश्यांना इंडियन एअर लाइन्स कॉर्पोरेशनच्या विमानातून प्रवास करावा लागतो. विमानांची संख्या वाढविण्याची आणि अद्ययावत विमाने वापरण्याची गरज असून त्यासाठी कॉर्पोरेशनला परदेशीय चलनात खर्च करावा लागणार आहे. परदेशी प्रचारासाठीही ७५ लाख रुपयांची गरज आहे.

## रासायनिक खतांच्या निर्यातीसाठी जपानचे प्रयत्न

दुसऱ्या महायुद्धानंतर जपानने आपली औद्योगिक व शेतकी संघटना मजबूत करून आर्थिक विकास साधला. बोटी बांधण्याच्या धंद्यात तर जपान अग्रेसरच आहे. जपानने सधन शेतीचाही चांगला विकास घडवून आणला असून आशियातील देशांचे शेतीचे उत्पन्न वाढविण्यासाठी लागणारा रासायनिक खतांचा पुरवठा जपान आता करू लागणार आहे. जपानची खतांची निर्यात सरकारमार्फत करण्यात येत असे, आणि आतापर्यंत ही निर्यात मुख्यतः कम्युनिस्ट चीन, दक्षिण कोरिया आणि फोर्मोसा ह्या देशांकडे होत असे. आता मात्र जपानी खत कारखानदारांनी आपला मोर्चा दुसरीकडे वळविण्याचे ठरविले आहे. जपानच्या एका प्रसिद्ध व्यापारी संघटनेने भारत, दक्षिण अमेरिका आणि आग्नेय आशिया ह्या भागांत आपली विक्री-मंडळे पाठविण्याचे ठरविले आहे. संघटनेत मुख्यतः अमोनिअम सल्फेट तयार करणारे कारखानदार आहेत. जपानमधील खताच्या कारखान्यांनी अलीकडेच आधुनिक यंत्रसामग्री बसविली असून उत्पादनक्षमता वाढविली आहे. परंतु ह्याच वेळी परदेशांची मागणी मात्र कमी होत चालली आहे. ह्या परिस्थितीला तोंड देण्यासाठी कारखानदारांना काही तरी हालचाल करणे आवश्यकच होते. कारण, खताचा उद्योगधंदा चालू ठेवण्यासाठी जपानला आपल्या एकूण उत्पादनापैकी ६० टक्के उत्पादन परदेशांत निर्यात करावे लागते. नाहीतर खताच्या कारखान्यांवर मागणीच्या अभावी अरिष्ट कोसळण्याचे भय आहे. भारतासारख्या देशांना आपले शेतीचे उत्पादन वाढविण्यासाठी रासायनिक खतांची मोठ्या प्रमाणावर गरज लागणार आहे. ह्या देशांची गरज आणि जपानची गरज मिळतीजुळती असल्याने जपानच्या विक्री-मंडळांना यश देण्याची चांगली शक्यता आहे.

## दरसाल ४५ लक्ष चोरटी घड्याळे

मुंबईच्या वॉच ट्रेड फेडरेशनच्या अंदाजाप्रमाणे, भारतात दरवर्षी ४५ लक्ष रिस्ट वॉचेसची चोरटी आयात होते. लोकांची घड्याळांची गरज भागविण्याचा चोरटी आयात हाच एकमेव मार्ग बनला आहे. भारतात दरसाल सुमारे ५० लक्ष रिस्ट वॉचेसचा खप होतो; ५०,००० घड्याळेही तयार होत नाहीत.

## हिंदी बंदरातून मालाच्या मोठ्या प्रमाणावर चोऱ्या

गेल्या दोन वर्षांत हिंदमधील बंदरात आयात करण्यात आलेल्या मालापैकी १७ लाख रुपये किमतीच्या मालाच्या चोऱ्या झाल्या, अशी माहिती अधिकृत गोटातून देण्यात आली आहे. मालाच्या चोऱ्या होण्याच्या बाबतीत मुंबई बंदराचा क्रमांक पहिला लागतो. मुंबई बंदरामधून १५·७० लाख रुपये किमतीच्या आयात मालाची चोरी करण्यात आली. कलकत्ता पोर्ट ट्रस्टच्या अधिकाऱ्यांनी माल नाहीसा झाल्याबद्दल मालाच्या मालकांना १·१५ लाख रुपयांची नुकसान भरपाई दिली. कांडला आणि मार्मागोवा बंदरात चोरी झाल्याचे आढळून आले नाही. विशाखापट्टण बंदरात २०० रुपये किमतीचा माल असलेले एकच खोके गहाळ झाले. कोचीन बंदरात चोरीच्या तक्रारी उद्भवल्या नाहीत. मद्रास बंदरात १९६३–६४ सालात ६,०४५ रुपयांचा व १९६४–६५ सालात १,९७४ रुपयांचा माल गहाळ झाल्याचे आढळून आले.

## रेडीमेड कपड्यांची निर्गत वाढत आहे

१९६५ मध्ये भारतातून ३·३२ कोटी रुपयांच्या रेडीमेड कपड्यांची निर्गत झाली; १९६२ मध्ये फक्त १७ लक्ष रुपयांच्याच रेडीमेड कपड्यांची निर्गत झाली होती. सुमारे ५० देशांकडे हिंदी रेडीमेड कपड्यांची निर्गत होते. त्यांपैकी अमेरिका व रशिया हे देश ७० ते ८०% कपडे घेतात. ग्रेट ब्रिटन, सिंगापूर, मलेशिया, इथिओपिआ, अफगाणिस्तान, एडन, स्वित्झरलंड, ह्या देशांची खरेदी त्यांचे खालोखाल आहे. मुंबई, मद्रास, बंगलोर, दिल्ली आणि कलकत्ता ही रेडीमेड कपड्यांच्या निर्मितीची प्रमुख केंद्रें आहेत. मुंबईत सर्वांत जास्त त्याचे कारखाने आहेत आणि निर्गतीत तेच अग्रेसर आहेत. सबंध भारतातील सुमारे १,००० कारखान्यांत मिळून दरसाल ३५ ते ४० कोटी रुपये किमतीचे रेडीमेड कपडे तयार होतात. त्यांत रेडीमेड शर्टांचें उत्पादन सर्वांत मोठे आहे. पायजमा, सूट्स्, विजारी, जीन्स, शॉर्ट्स, कोट, ड्रेसिंग गाउन्स, नेकटाईज, ब्रेसिअर्स, पेटिकोट, ब्लाउझेस आणि स्लॅक्स हे इतर कपडेही मोठ्या प्रमाणावर तयार केले जातात.

## मुलीच्या कौमार्याचा विमा

पश्चिम युरोपांतील औद्योगिक भरभराटीमुळे तेथे कामगारांचा तुटवडा आहे. त्या परिस्थितीचा फायदा घेण्यासाठी युरोपांतील इतर ठिकाणचे, विशेषतः स्पेनमधील आणि दक्षिण इटलीमधील लोक तेथे काम करण्यास जातात. स्त्री-पुरुषांच्या ह्या देशान्तरामुळे कित्येक सामाजिक समस्या निर्माण होतात. त्याचा हा नमुना पाहा. "दि गार्डियन" ह्या ब्रिटिश वृत्तपत्रात खालीलप्रमाणे बातमी प्रसिद्ध झाली होती :—

"बोलझॅनो, मे १९ : एका सिसिलिअन कामगाराची १६ वर्षांची कन्या जर्मनींत मोलकरणीचे काम करण्यासाठी जाणार असल्याने, त्याने एका ऑस्ट्रिअन विमा कंपनीला तिच्या कौमार्याचा विमा उतरण्यासाठी लिहिले आहे, 'विमा कंपनीने मुलीची वैद्यकीय तपासणी करावी; ती इटलीला परत येईल त्यावेळी ती कुमारीच राहील ह्याचा ५७५ पौंडांचा विमा घेण्यास मी तयार आहे आणि त्यासाठी दरमहा ३० शिलिंग हप्ता मी देण्यास तयार आहे."

## पश्चिम जर्मन सरकारची मदत

मद्रास राज्यातील निलगिरी जिल्ह्यातील शेतीला मदत करण्यासंबंधी भारत व पश्चिम जर्मन सरकारांनी करार केलेला आहे. कराराप्रमाणे पश्चिम जर्मन भारताला शेतीच्या पद्धतीची पुनर्घटना करण्यासाठी तज्ज्ञ आणि साधने पुरविणार आहे. पश्चिम जर्मन सरकारने अशाच प्रकारची मदत हिमाचल प्रदेशातील शेतीसाठी केलेली आहे. जर्मन तज्ज्ञांची एक तुकडी तीन वर्षेपर्यंत भारतात राहून बटाट्याची लागवड, वनस्पतींचे संरक्षण, फळबागांची व भाजीपाल्याची लागवड, इत्यादी बाबतीत मार्गदर्शन करणार आहे. त्याचप्रमाणे ग्रामीण भागातील पाणीपुरवठ्याच्या व्यवस्थेबाबतही ते मार्गदर्शन करतील. जर्मन सरकार भारताला चांगल्या प्रतीचे बी–बियाणे, जमीन कसण्याची छोटी अवजारे आणि पाणीपुरवठ्याची साधने ह्यांचाही पुरवठा करणार आहे. हिंदी शेतकऱ्यांना जर्मनीत नेऊन शिक्षण देण्यात येणार आहे.

## गुजरात राज्यात अमेरिकन शेतीतज्ज्ञ

गुजरात राज्यांतील अन्नधान्याच्या वाढीच्या योजनांना मदत करण्यासाठी ६ अमेरिकन शेतीतज्ज्ञ आले आहेत. अन्नधान्याच्या वाढीसंबंधी ते मार्गदर्शन करणार आहेत. अमेरिकेच्या आंतरराष्ट्रीय विकास संघटनेतर्फे ही तुकडी पाठविण्यात आली आहे. गुजरात राज्यात जुनागड, राजकोट, बडोदा आणि सुरत ह्या ठिकाणी शेती संशोधन केंद्रांची स्थापना करण्यात आली आहे. ह्या संशोधन केंद्रांत राहून अमेरिकन तज्ज्ञ काही प्रयोग करणार आहेत. त्यांनी आपल्याबरोबर शेतीची काही आधुनिक अवजारेही आणली आहेत. अमेरिकन तज्ज्ञ गुजरातमध्ये ५ वर्षेपर्यंत राहणार आहेत. परदेशांतून आलेल्या शेती तज्ज्ञांची ही दुसरी तुकडी आहे. व्यारा येथे जपानी तज्ज्ञांची एक तुकडी भाताच्या लागवडीसंबंधी काही प्रयोग करीत आहे.

## विशाखापट्टम येथील कारखान्याचा विस्तार

विशाखापट्टम येथील बोटी बांधणीच्या कारखान्याचा विस्तार करण्याचे काम चालू आहे. ते पूर्ण झाल्यावर तेथे प्रत्येकी १२,३०० टन वजनाच्या ६ बोटी दरसाल बांधल्या जाऊ शकतील. कारखान्याच्या विस्ताराचे व सुधारणेचे काम एका हिंदी कंपनीला देण्यात आले असून कंपनीला परदेशी सल्लागारांच्या अनुभवाचा व ज्ञानाचा फायदा मिळत आहे. हे देशी व परदेशी तंत्रज्ञ कारखान्यासंबंधीचा आराखडा व नकाशे नव्याने तयार करणार आहेत. बोटी बांधण्याची कारखान्याची क्षमता वाढविण्यासाठी एंजिनिअरिंगच्या अत्याधुनिक पद्धतींचा वापर करण्यात यावयाचा आहे.

## शेतीसाठी उपयुक्त विमानांची निर्मिती

भारत सरकारच्या शेती खात्याला जरूर असणाऱ्या एका प्रकारच्या विमानाचे उत्पादन बंगलोर येथील विमानांच्या कारखान्यात करण्यात येणार आहे. विमानांची कल्पना व बांधणी संपूर्णतः देशी आहे. अशी २०० विमाने तयार करण्यात यावयाची आहेत. अशा प्रकारची विमाने परदेशात आयती मिळू शकतील. परंतु रुपयाचे अवमूल्यन झाल्यामुळे त्यांच्या किमती आता भरमसाठ वाढलेल्या असताल. सध्या 'कृषक' ह्या जातीचे एक विमान शेतीसाठी वापरण्यात येत असते. नव्याने तयार करण्यात येणारे विमान ह्या विमानापेक्षा अधिक चांगल्या प्रतीचे असेल. भारतामधील विशिष्ट परिस्थिती लक्षात घेऊन त्याची रचना करण्यात येणार आहे.

### किमती खाली आणण्यासाठी करकपातीची सूचना

इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स ह्या संघटनेचे अध्यक्ष श्री. कनोरिया ह्यांनी भारत सरकारला एक निवेदन पाठवून किंमती खाली आणण्याची सूचना केली आहे. ते आपल्या निवेदनात म्हणतात की सध्या साखर, वनस्पती तेले, औषधे, सुती व लोकरी कापड, काड्याच्या पेट्या आणि साबण ह्या वस्तूंवर अबकारी कर घेण्यात येतो. ह्या वस्तूंवरील अबकारी करात ५० टक्के कपात करण्यात यावी. करकपातीमुळे सरकारच्या उत्पन्नात ८० कोटी रुपयांची तूट येईल हे खरे; पण लोकांना नेहमी लागणाऱ्या वस्तू वाजवी भावात उपलब्ध करून देण्याचा सरकारचा निर्धार त्यामुळे लोकांना कळेल आणि त्यांच्या मनावर अनुकूल परिणाम होईल. रुपयाच्या अवमूलनानंतर उद्योगधंद्यावरील करांत सुमारे २५० कोटी रुपयांची सवलत देणे आवश्यक झाले आहे. अशी सवलत देण्यात आली तर वस्तूंच्या भावांत अवाच्या सवा वाढ होणार नाही आणि उद्योगधंद्याच्या उत्पादनात झपाट्याने वाढ होईल. त्याचा परिणाम म्हणून अधिक वस्तू निर्यात करण्यास उपलब्ध होतील आणि त्याचबरोबर लोकांनाही अधिक प्रमाणात वस्तू मिळू लागतील. करकपात केल्यामुळे सरकारच्या अंदाजपत्रकावर विपरीत परिणाम होणार नाही. कारण, अंदाजपत्रकात आयात करापासून उत्पन्न होणारे जे उत्पन्न धरण्यात आले आहे त्यापेक्षा सुमारे १३५ कोटी रुपयांचे अधिक उत्पन्न होण्याची शक्यता आहे. नव्याने बसविण्यात येणाऱ्या निर्यात करापासून १२० कोटी रुपयांचे उत्पन्न मिळू शकेल. अवमूलनाने होणारे फायदे पदरात पाडून घेण्यासाठी त्वरित उपाययोजना करणे अगत्याचे आहे. पण वाढत जाणाऱ्या किमती रोखण्यासाठी आणि उत्पादन वाढविण्यासाठी निर्भयपणाने पावले टाकण्यास सरकार विलंब लावीत आहे.

### मच्छीमारीच्या धंद्यासाठी रशिआची मदत

खोल समुद्रातील मच्छीमारीच्या धंद्यासाठी मदत देण्याविषयी रशिआशी करार करण्यात येणार आहे. ह्या धंद्यासाठी लागणाऱ्या दोन प्रकारच्या बोटी रशिआ देणार असून त्या वापरून पाहण्यात आल्यावर कशा प्रकारच्या बोटी उपयुक्त ठरतील का, ह्याविषयी निर्णय घेण्यात येईल. अनुभवाने उपयुक्त ठरलेल्या बोटींची माहिती रशिआला कळविण्यात येईल आणि नंतर योग्य अशा बऱ्याच बोटी रशिआकडून पाठविण्यात येतील. हिंदी खलाशांना बोटी व त्यावरील सामग्री वापरण्याचे शिक्षणही रशिआ देणार आहे. मच्छीमारीस उपयुक्त ठरणाऱ्या बोटी बांधण्यासाठी एक गोदी बांधून देण्याची तयारी रशिआने दाखविली आहे. तथापि अजून गोदीची जागा ठरविण्यात आलेली नाही. जागेची निवड करण्यापूर्वी अनेक योग्य जागांची पाहणी करण्यात येत आहे.

### संततिनियमनाची मुख्य समस्या: वेळ अपुरा पडेल

लूपचा अमेरिकन संशोधन, डॉ. जॅक लिप्स, ह्यांनी आपला येथील दौरा आटोपल्यावर भारत सरकारला अहवाल सादर केला आहे. लोकसंख्येच्या समस्येविषयी त्यांनी म्हटले आहे, "येथे दळणवळणाच्या साधनांच्या, डॉक्टरांच्या किंवा परदेशी हुंडणावळीच्या तुटवड्याचा प्रश्न नसून वेळेच्या अपुरेपणाचा आहे. आणखी १० वर्षांत भारताच्या लोकसंख्येत २० कोटींची भर पडली, तर ह्या तोंडांत घास घालायला भारत आणि त्याची मित्र राष्ट्रेही असमर्थ ठरतील."

### मुंबईमधील राहत्या जागांचा बिकट प्रश्न

मुंबईमधील राहत्या जागांचा तुटवडा किती मोठा आहे त्याची जाणीव देणाऱ्या घटना अधूनमधून घडत असतात. मुंबईत हजारो लोक रस्त्याच्या कडेला असणाऱ्या पदपथावरच आपला संसार करीत असतात, हे जगजाहीरच आहे. तथापि, राहत्या जागांची टंचाई तीव्रपणे लक्षात येण्यासाठी तसाच काही प्रसंग घडावा लागतो. असा प्रसंग कुर्ला येथे बांधण्यात आलेल्या २७८ बिऱ्हाडांच्या वाटणीच्या प्रसंगाने नुकताच घडला. ह्या बिऱ्हाडाच्या जागा अखेर कोणास मिळतील त्या मिळो; पण त्या जागांसाठी केवळ अर्ज करण्यासाठी ३७ हजार लोक आले आणि अर्जाचे फॉर्म्स मिळविण्यासाठी त्यांच्यांत झिम्मड उडाली. हे गाळे फक्त कामगारांच्यासाठी बांधण्यात आले असून त्यांच्याशिवाय इतरांना ह्या जागा मिळावयाच्या नाहीत, असे असतांनासुद्धा जागा मिळविण्यासाठी इतकी गर्दी झाली. ह्यावरून राहत्या जागांच्या टंचाईची तीव्रता लक्षात येते. कामगार वर्ग सोडला तर इतर अनेक लोकांनाहि राहण्यास जागा नाही ही वस्तुस्थिति आहे. घरटंचाईचा प्रश्न सोडविण्याच्या कामी सरकार, स्थानिक स्वराज्य संस्था आणि घरे बांधणारे खाजगी लोक ह्यांच्यांत सहकार्य व्हावयास पाहिजे. परंतु त्या कामी अनेक अडचणी आहेत. दरम्यान मुंबईसारख्या मोठ्या शहरांतून अनेक मजली उंच हवेल्या बांधून टंचाईवर थोडाबहुत उतारा देता येण्यासारखा आहे. तरीही हा प्रश्न त्यामुळे सुटण्याच्या मार्गास लागणार नाही. भारतामधील सर्वच मोठ्या शहरांची लोकसंख्या अलीकडे प्रमाणाबाहेर फुगलेली आहे. त्यातूनच गलिच्छ वस्त्या नव्याने उद्भवतात. अपुऱ्या जागेत अतिशय दाटीवाटीने राहणाऱ्यांची संख्याही फार मोठी होत चालली आहे.

### गुजरात राज्यासाठी औद्योगिक कॉर्पोरेशन

गुजरातमध्ये उद्योगधंद्यांची वाढ झपाट्याने व्हावी म्हणून एका इंडस्ट्रिअल इन्व्हेस्टमेंट कॉर्पोरेशनची स्थापना करण्यात येणार आहे. त्याचे अधिकृत भांडवल १० कोटी रुपये असेल. राज्य सरकारच्या उद्योगखात्याने सुचविलेली कॉर्पोरेशनच्या स्थापनेची योजना मंजूर करण्यात आली असून, खुद्द राज्य सरकार कॉर्पोरेशनच्या भांडवलापैकी ४९ टक्के भांडवल घेणार आहे. बाकीचे भांडवल उद्योगपती व भांडवल जमविणारे एजंट जमा करणार आहेत. भांडवलबाजारात फारसा उत्साह दिसून येत नसल्याने सरकारला ही योजना अंमलात आणावी लागली. कॉर्पोरेशन नवीन उद्योगधंदे काढण्यास मदत देईल; त्याचप्रमाणे चालू उद्योगधंद्यांपैकी चांगल्या उद्योगधंद्यांत भांडवल गुंतवील. अडचणीत सापडलेल्या उद्योगधंद्यांना साह्य करण्याचे कामही ते करील.

### मोठ्या खर्चाच्या प्रकल्पासंबंधी तक्रार

चौथा पंचवार्षिक कार्यक्रम अवाढव्य व भारताला न पेलण्यासारखा असल्याची तक्रार पुष्कळ वेळा करण्यात येते. ह्या कार्यक्रमातील खर्चाला कात्री लावण्यात येणार असल्याचीही वार्ता ऐकू येते. भारत सरकारच्या आरोग्यमंत्री डॉ. सुशीला नायर ह्यांनी मुंबई येथे एका प्रसंगी बोलताना कार्यक्रमांतील मोठ्या प्रकल्पाविषयी नापसंती व्यक्त केली; त्या म्हणाल्या की ह्या मोठ्या प्रकल्पांवर प्रचंड खर्च करण्यात येतो; पण त्यांची फळे लोकांना मिळण्यास अनेक वर्षांचा अवधी लागतो; १० लाख टन पोलादाची निर्मिती करणारे प्रचंड कारखाने उभारण्याचा हेतू काय असा प्रश्नही त्यांना केला व केवळ इभ्रतीसाठी मोठे प्रकल्प आखण्यात येतात, असे सूचित केले.

## विद्यापीठे व कॉलेजें ह्यांतून सहकारी भांडारे

### १ कोटी रुपये मध्यवर्ती सरकार गुंतविणार

विद्यापीठे आणि महाविद्यालये ह्यांतून सहकारी भांडारे काढण्यासाठी भारत सरकारने एक कोटी रुपये मंजूर केले आहेत. ही योजना सहकारी खात्याने युनिव्हर्सिटी ग्रँट्स कमिशनशीं विचारविनिमय करून आखली आहे. विद्यापीठे आणि कॉलेजे ह्यांतील विद्यार्थ्यांपैकी १०० टक्के विद्यार्थी ह्या योजनेत सहभागी व्हावेत, अशीच योजना आहे. चालू वर्षीच सर्व विद्यापीठांतून व निम्म्या तरी कॉलेजांतून अंमलबजावणी होईल.

एक कोटी रुपयांपैकी ७५ लक्ष रुपये खेळत्या भांडवलासाठी दिले जातील. मोठ्या विद्यापीठांच्या भांडारांना प्रत्येकी २ लक्ष रुपये दिले जातील; बाकीच्यांना प्रत्येकी १ लक्ष रुपये मिळतील. व्यवस्थापनाच्या खर्चाला मदत म्हणून २५ लक्ष रुपयांची सबसिडी दिली जाईल.

प्रत्येक विद्यापीठाच्या आणि कॉलेजाच्या प्रत्येक विद्यार्थ्याने तेथील भांडाराचा ५ रुपयांचा किमान एक तरी भाग घेतला पाहिजे. ही रक्कम विद्यार्थ्यांकडून प्रवेशाच्या वेळी घ्यावयाच्या रकमेत समाविष्ट करता येईल.

६५ विद्यापीठे आणि १,४०० कॉलेजे ह्यांची वार्षिक पुस्तकखरेदीच २ कोटी रुपयांची आहे. विद्यार्थी पुस्तके खरीदतात, ती वेगळीच. विद्यापीठे व कॉलेजे ह्यांना लागणाऱ्या पुस्तकांचा सबंध धंदा अशा रीतीने सहकारी क्षेत्रांत येईल. पुस्तकाबरोबर विद्यार्थ्यांना लागणाऱ्या इतरही जिनसा भांडारे पुरवितील.

## ब्रिटिश लष्करातील गुरखा पलटणी

### ५ कोटी रुपयांची प्राप्ती

ग्रेट ब्रिटन व नेपाळ ह्यांच्यातील दहा वर्षांच्या कराराप्रमाणे, पूर्व आशियातील आपल्या फौजांसाठी ग्रेट ब्रिटनचे सरकार १५,००० गुरख्यांना सैन्यात नोकरी देते. पुढील वर्षी ह्या कराराची मुदत संपत आहे. ग्रेट ब्रिटनच्या परराष्ट्रीय कचेरीतील उपसचिव लॉर्ड वॉल्स्टन हे नेपाळमध्ये नुकतेच गेले होते, तेव्हा त्यांनी गुरख्यांच्या ह्या संख्येत कपात केली जाणार नाही, असे नेपाळ सरकारला आश्वासन दिले आहे. ब्रिटिश लष्करात मलाया, सिंगापूर, आणि हाँगकाँग येथे गुरखा पलटणी ठेवलेल्या आहेत आणि त्यांच्या पगारामुळे व पेन्शनामुळे नेपाळला वार्षिक ५ कोटी रु. मिळतात.

---

### रिझर्व्ह बँकेच्या ताब्यांतील कागदपत्र बेपत्ता झाले

स्पेशल एन्फोर्समेंट ब्रँचच्या अधिकाऱ्यांनी नागपुरातील काही पेढ्यांची व व्यापाऱ्यांच्या घरांची झडती घेऊन कित्येक दस्तऐवज व कागदपत्र जप्त केली. आयात-निर्यात निर्बंधाचे भंग केल्याच्या आणि मध्यवर्ती सरकारचे कर चुकविण्याच्या आरोपाबाबत तपासासाठी ते कागद दिल्लीला पाठवावयाचे होते. स्पे. ए. ब्रँचच्या अधिकाऱ्यांना कागदपत्र नागपूरच्या बाहेर नेण्यास बंदी करावी आणि ते कागदपत्र रिझर्व्ह बँकेच्या नागपूर कचेरीत बंदोबस्ताने ठेवण्यात यावे, असा व्यापाऱ्यांनी हायकोर्टाला अर्ज करून त्याप्रमाणे हुकूम मिळवला. अर्जदारांना हे कागदपत्र सरकारी अधिकाऱ्याच्या समक्ष मधूनमधून पाहाण्यास मिळावेत, असाही हायकोर्टाने आदेश दिला. पण, एन्फोर्समेंट ब्रँचचे अधिकारी तपासासाठी कागद पाहण्याकरिता रिझर्व्ह बँकेत गेले, तेव्हा त्यांना कित्येक फायली बेपत्ता झाल्या असल्याचे आढळून आले. त्या शोधण्यासाठी आता नागपुरात ठिकठिकाणी झडत्या घेतल्या जात आहेत.

## चित्रपटतारकांचा राजकारणात प्रवेश

मद्रासकडील चित्रपट नट-नट्यांचा राजकीय निवडणुकीसाठी उपयोग करून घेण्यात येत असल्याच्या बातम्या आहेत. काँग्रेस पक्षाने पद्मिनी ह्या सुप्रसिद्ध नटीचे सहकार्य मिळविले आहे. एका सत्कारसमारंभाचे वेळी ती म्हणाली, "मला काँग्रेसचा कार्यक्रम पसंत असून त्याच्या लोकशाही समाजवादाच्या पुरस्कारार्थ झटण्याचे मी आश्वासन देते. येत्या निवडणुकीत काँग्रेस निवडून यावी, ह्यासाठी मी शक्य तो प्रयत्न करीन. ह्या माझ्या निर्णयामुळे एक सुप्रसिद्ध नट (द्रविड कझागमचा रामचंद्रन्) माझ्या समवेत चित्रपटात काम करण्यास तयार होणार नाही, हे मी जाणून आहे. ह्या नटाच्या ह्या वृत्तीमुळे कित्येक नट्या काँग्रेसला येऊन मिळायला भीत आहेत. पण माझ्यापुरते बोलायचे झाले, तर मला चित्रपटातील कामापेक्षा काँग्रेसचे काम जास्त महत्त्वाचे वाटते." पद्मिनीने तामीळ चित्रपटसृष्टी पूर्वी गाजविली होती. चार वर्षांपूर्वी, विवाहानंतर, ती निवृत्त झाली होती. ती पुनः ह्या व्यवसायात येण्यास उत्सुक होती, पण तिची जागा नव्या नट्यांनी घेतलेली तिला आढळून आले. तरीसुद्धा तिच्या नावाला अजून आकर्षण आहे.

द्रविड कझागमला एम. जी. रामचंद्रन् ह्या लोकप्रिय नटाचा पाठिंबा आहे. मद्रासमधील कित्येक स्टुडिओ त्याच्या नियंत्रणाखाली असून सिनेमा धंद्यांतील तो म्हणजे एक बडे प्रस्थ आहे. त्याचे सुमारे तीन चित्रपट दर महिन्याला चित्रपटगृहातून लागतात. तेव्हा त्याला चित्रपटात काम देण्यासाठी निर्मात्यांत चढाओढ सुरू होते. रामचंद्रन्‌कडेच नट-नटी निवडण्याचे, दिग्दर्शक, कथालेखक आणि संगीत नियोजक ठरविण्याचे काम येते. त्याने नुकताच कोइमतूर आणि तिरुची जिल्ह्यांचा आपल्या पक्षासाठी फंड गोळा करण्याकरिता दौरा केला. राजेंद्र हा त्याच पक्षातला नट स्वतः असेंब्लीचा सभासद आहे. त्याची पत्नीही नटी असून (विजयकुमारी) तीही राजकीय कार्यात भाग घेते. "मी लवकरच एका मंत्र्याची पत्नी होणार आहे" असे ती एका जाहीर भाषणात म्हणाली; तिला म्हणावयाचे होते, "माझ्या पतीला पुढच्या मंत्रिमंडळात जागा मिळेल."

---

## कंपनीच्या राजकीय पक्षांना देणग्या

### वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्याची जरूरी नाही

कंपनीला राजकीय पक्षांना देणग्या देता याव्यात, ह्यासाठी टाटा आयर्न अँड स्टील कंपनी लि. ने नऊ वर्षांपूर्वी आपला मेमोरँडम ऑफ असोसिएशन मुंबई हायकोर्टाकडे अर्ज करून बदलून घेतला. त्या वेळी हायकोर्टाने कंपनीवर एक अट घातली, ती म्हणजे ह्या देणग्या कंपनीने दर वर्षी दोन वृत्तपत्रांतून जाहीर केल्या पाहिजेत.

कंपनी कायद्याच्या २९३–ए ह्या कलमाने अशा देणग्यांना परवानगी दिली असून त्यांची कमाल रक्कम ठरवून दिली आणि त्या देणग्या नफा-तोटा पत्रकात दाखविल्या पाहिजेत, असे बंधन घातले. हायकोर्टाने पूर्वी कंपनीवर अट घातली, तेव्हा २९३–ए हे कलम अस्तित्वात नव्हते. तेव्हा, हायकोर्टाच्या पूर्वीच्या हुकुमातील, देणग्या वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्याबाबत बंधन आता काढून टाकण्यात यावे, असा अर्ज कंपनीने हायकोर्टाकडे केला. तो मंजूर झाला. भागीदारांतर्फे सांगण्यात आले की पूर्वीचे बंधन भागीदारांच्या हिताचे आहे. पण हायकोर्टाने वरीलप्रमाणे निवाडा केला. त्यामुळे कंपनीने नऊ वर्षे पाळलेले बंधन ह्यापुढे तिच्यावर उरलेले नाही.

## गुन्हेगारीत सतत वाढ होत आहे

भारत सरकारने गुन्हेगारीसंबंधी जमा केलेल्या आकडेवार माहितीवरून असे दिसून येते की, १९६१ ते १९६५ ह्या दरम्यानच्या काळात देशातील गुन्हेगारीत सतत वाढ होत चालली आहे. १९६२ पर्यंत गुन्हेगारीत होत जाणारी वाढ १९६३ मध्ये थोडी कमी झाली; परंतु नंतरच्या दोन वर्षांत ती पुन्हा वाढू लागली. ह्या वाढीतील काही हिस्सा गुन्ह्यांची अधिक व्यवस्थित नोंदणी सुरू झाल्यामुळे उघड झाला असावा. तरीपण गुन्ह्यांच्या वाढीला कारणीभूत ठरणारी अनेक प्रकारची परिस्थिती दिसून येते. एकतर देशातील आर्थिक परिस्थिती खालावत चाललेली आहे. नुसते जगण्यासाठी लागणारा खर्च भरमसाठ वाढलेला आहे. त्यामुळे आर्थिक लाभासाठी करण्यात येणारे गुन्हे साहजिकच वाढले आहेत. लोकसंख्येची झपाट्याने झालेली वाढ, काही भागातून झालेले जलद गतीचे उद्योगीकरण, हीहि कारणे सांगता येतील. गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवण्याचे काम पोलिस संघटनांचे; पण ह्या रक्षक संघटनेला गुन्हेगारीकडे पुरेसे लक्ष देता आले नाही. कारण, त्यांचा वेळ आणि त्यांचे श्रम देशात शांतता व सुरक्षितता राखण्यासाठी मोठ्या प्रमाणावर वापरावे लागले. खेड्यांतील गुन्हेगारीच्या बाबतीत ग्रामीण भागातील गटबाजीला बऱ्याच प्रमाणात जबाबदार धरावे लागत आहे. सर्वसाधारणपणे शहरातून गुन्ह्यांची संख्या फुगत चाललेली आहे. कानपूर, कलकत्ता, दिल्ली, मद्रास आणि मुंबई ही शहरे ह्या बाबतीत आघाडीवर आहेत. त्यातही कलकत्ता आणि मुंबई शहरांत खुनाचे गुन्हे अधिक प्रमाणात होतात. बिहार, मद्रास आणि उत्तर प्रदेश ह्या राज्यांतून दरोड्याचे गुन्हे अधिक झालेले आढळून आले. उत्तरप्रदेशात सप्टेंबर १९६५ अखेर संपलेल्या तिमाहीत ४६२ दरोडे पडले. ह्याच तिमाहीत बिहारमध्ये १९६ आणि मद्रासमध्ये १३९ दरोडे घालण्यात आले.

## चित्रपटांच्या उत्पादनखर्चात वाढ

रुपयाच्या अवमूल्यनामुळे हिंदी चित्रपटांचा उत्पादनाचा खर्च वाढला आहे. चित्रपटासाठी लागणारी कच्ची फिल्म, काही रसायने आणि स्टुडिओमधील सामान भारताला आयात करावे लागते. ह्या सर्वच सामग्रीच्या किमती अवमूल्यनामुळे वाढल्या आहेत. आतापर्यंत ह्या निर्यातीसाठी दरसाल सुमारे ३ कोटी रुपयांचे परदेशीय चलन लागत असे; आता ५ कोटी रुपयांचे चलन लागणार आहे. सध्या हिंदी चित्रपटांच्या निर्यातीपासून देशाला सुमारे २ कोटी रुपयांचे परदेशीय चलन मिळते. त्यात वाढ होऊन ते ३ कोटीपर्यंत तरी वाढले किंवा नाही हे इतक्यात सांगता येणार नाही. १९६५ साल हिंदी चित्रपटांच्या निर्यातीच्या दृष्टीने चांगले गेले नाही. भारत-पाक संघर्ष झाल्यापासून ब्रिटन, अफगाणिस्तान व इराणच्या आखातामधील देशाकडील निर्यात रोडावली.

## न्यायाधीशांच्या मेहनताऩ्यात वाढ होणार ?

मुंबई हायकोर्टाच्या एका न्यायमूर्तींनी आणि मुंबईतीलच दुसऱ्या एका न्यायाधीशाने आपल्या नोकरीचा राजीनामा दिल्यापासून हायकोर्टाच्या व इतर न्यायाधीशांच्या पगाराच्या प्रश्नावर चर्चा चालू झाली आहे. मध्यवर्ती सरकारचे कायदामंत्री श्री. पाठक ह्यांनी ह्या विषयासंबंधी गृहमंत्री व शिक्षणमंत्री ह्यांना पत्रे पाठविली आहेत. कोर्टातून वकिली करणाऱ्या चांगल्या वकिलांतून न्यायाधीशांची भरती करता यावी म्हणून न्यायाधीशांचे पगार वाढविण्यात यावेत अशी सूचना त्यांनी केली आहे. पगारवाढीशिवाय न्यायाधीशांना मोफत राहण्याची जागा व मोटार देण्यात यावी असेही सुचविण्यात आले आहे. मध्यवर्ती मंत्रिमंडळ ह्या विषयाचा लवकरच विचार करणार असल्याची वार्ता आहे. पूर्वी भारताच्या एका सरन्यायाधीशांनी पगार वाढविण्याची सूचना केली होती. पण, तिचा उपयोग झाला नाही. काही मंत्र्यांच्या मताने न्यायदान स्वस्त करण्याच्या दृष्टीने न्यायाधीशांचे पगार वाढविणे अयोग्य आहे.

## चीनचा 'स्वतंत्र' काश्मीरला पाठिंबा ?

पीकिंग येथे आफ्रिकन व आशियाई देशांतील लेखकांची एक तातडीची बैठक भरविण्यात आली होती. ह्या बैठकीला आलेले प्रतिनिधी आपापल्या देशांचे खरेखुरे प्रतिनिधी होते की नाही हे सांगता येणार नाही. परंतु ह्या बैठकीत काश्मीरविषयी मंजूर करण्यात आलेला ठराव पाकिस्तानला मानवण्यासारखा नाही. ठरावात पाकिस्तानचा प्रत्यक्ष उल्लेख केलेला नसला तरी त्यावरून काश्मीरचे राज्य 'स्वतंत्र' ठेवण्याच्या कल्पनेस चीनचा पाठिंबा दिसून येतो. भारत–पाकिस्तान ह्यांच्यात गेल्या वर्षी झालेल्या संघर्षानंतर रशियातील ताश्कंद येथे तात्पुरती तडजोड घडवून आणण्यात आली आणि त्या कामी रशियाच्या वजनाचा उपयोग झाला. काश्मीरच्या प्रश्नासंबंधी रशियाचा पाठिंबा मिळविण्याचे पाकिस्तानचे प्रयत्न तेव्हापासूनच सुरू झाले असा चीनच्या सरकारचा ग्रह झाला असून, चीन व रशिया ह्यांच्यांतील सध्याची हमरीतुमरी लक्षात घेता ही गोष्ट चीनला बोचणे साहाजिक आहे. हा ठराव म्हणजे एका अर्थाने चीनने पाकिस्तानला दिलेला इशाराच म्हणता येईल. काश्मीरचे भवितव्य तेथील जनतेने स्वयंनिर्णयाच्या तत्त्वाप्रमाणे सोडवावयाचे आहे ही चीनची भूमिका ठरावात अर्थातच मांडण्यात आली आहे. परंतु ठरावाची मजल त्यापुढेही गेली आहे. काश्मीरमध्ये असलेल्या सर्व परकीय फौजा काढून घेतल्या जाव्यात असे सुचविण्यात आलेले आहे. काश्मीरमधील हिंदचे लष्कर चीनने नेहमीच परकीय मानलेले आहे. परंतु आझाद काश्मीर ह्या नावाखाली पाकिस्तानने व्यापलेल्या काश्मीरच्या प्रदेशातील पाकिस्तानी लष्कराला आतापर्यंत परकीय लेखण्यात आलेले नाही. चीनच्या पुरस्काराने भरलेल्या लेखकांच्या बैठकीत व्यक्त झालेले हे नवे धोरण सूचक म्हणावे लागते.

## पाकिस्तानला झेकोस्लोव्हाकिआचे कर्ज

झेकोस्लोव्हाकिआने पाकिस्तानला १ कोटी पौंडांचे कर्ज देण्याच्या करारावर सही केली आहे. उभयता देशांच्या संमतीने औद्योगिक प्रकल्पासाठी कर्जाचा उपयोग करण्यात यावयाचा आहे. ह्या प्रकल्पात एक वीजकेंद्र आणि एक खताचा कारखाना ह्यांचा समावेश आहे. कर्जावरील व्याजाचा दर २॥ टक्के असून त्याची परतफेड १० ते १२ वर्षांच्या अवधीत करावयाची आहे. कर्जाच्या परतफेडीची व्यवस्थाही करारातच नमूद करण्यात आली आहे. कर्जापैकी ६० टक्के कर्ज पाकिस्तानमध्ये तयार करण्यात आलेला माल झेकोस्लोव्हाकिआला निर्यात करून फेडण्यात येईल. आणि बाकीचे म्हणजे उरलेले ४० टक्के कर्ज परदेशीय चलनाच्या रूपात फेडण्यात यावयाचे आहे. पाकिस्तानला कम्युनिस्ट देशांकडून होत असलेल्या मदतीचे हे दुसरे उदाहरण आहे.

### सारस्वत को. बँकेची प्रगती

नेहमीच्या आणि आवश्यक तरतुदी केल्यानंतर सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँकेला ३० जून, १९६६ अखेर संपलेल्या वर्षी १·९२ लक्ष रुपये निव्वळ नफा उरला; गेल्या वर्षी तो १·८९ लक्ष रुपये होता. बँकेचे वसूल भांडवल १२·२८ लक्ष रुपये असून रिझर्व्ह फंड वसूल भांडवलापेक्षा जास्त म्हणजे १६·०७ लक्ष रुपये आहे. गेल्या वर्षी ठेवी ४४३·६४ लक्ष रुपयांच्या ४७५·०९ लक्ष रुपये झाल्या; म्हणजे ठेवीत ७% वाढ झाली. बँकेने ठेवींच्या ३८% म्हणजे १८२·०१ लक्ष रुपये कर्जाऊ दिलेले आहेत. तरती जिंदगी ३१०·३६ रुपयांची म्हणजे ठेवींच्या ६५% आहे. खेळते भांडवल ४८१·१७ लक्ष रुपयांचे ५१४·२९ लक्ष रुपये झाले. पूर्वीइतकेच, म्हणजे ७% करमाफ डिव्हिडंड देण्याची व्यवस्थापक मंडळाची शिफारस आहे.

### सहकारी साखरकारखान्यांचे उसाचे ठरविलेले भाव

महाराष्ट्रांतील प्रत्येक सहकारी कारखान्याचा उसाचा भाव ठरवून देण्यासाठी नेमलेल्या समितीने १९६५–६६ सालाच्या हंगामासाठी भाव पुढीलप्रमाणे ठरविले आहेत. ( १ ) अशोक टनाला ५९·२५ रुपये ( २ ) राहुरी–६०·५० रु. ( ३ ) गणेश ६०·२५ रु. ( ४ ) संजीवनी–५८ रु. ( ५ ) मालेगाव–६४ रु. ( ६ ) श्रीछत्रपती–५८ रु. ( ७ ) सोमेश्वर–६४·५० रु. ( ८ ) वारणा ६५·५० रु. ( ९ ) भोगावती–६१ रु. ( १० ) दूधगंगा, वेदगंगा–५३·५० रु. ( ११ ) कुंभी कासारी ५५·५० रु. ( १२ ) शेतकरी सहकारी–६१·५० रु. ( १३ ) गिरणा ५५·५० रु. ( १४ ) यशवंत–६१·५० रु. ( १५ ) कृष्णा ६७·५० रु. (१६) पंचगंगा–६० रु. (१७) निफाड ४६·५० रु.

कोपरगाव व प्रवरा कारखान्यांनी सरकारी कर्जे घेतलेली नसल्याने त्यांनी आपापले भाव स्वतः ठरविले असून ते अनुक्रमे ६३ रु. व ६४ रु. असे आहेत.

### उपयुक्त खनिजांच्या शोधाची मोहीम

लोहेतर उपयुक्त खनिजांच्या साठ्यांचा शोध लावण्याची मोहीम हिंदमध्ये काढण्यात आलेली होती. तांबे, शिसे आणि जस्त ह्या खनिजांच्या शोधाबावत ह्या मोहिमेला चांगले यश आले असून ह्या धातूंच्या खाणी उघडण्यासाठी योजना आखण्यात येणार आहे. त्याचबरोबर इंडिअन ब्यूरो ऑफ माइन्स करीत असलेल्या कामाची पाहणी करण्याचे ठरविण्यात आले आहे. पाहणी पूर्ण झाल्यानंतर संघटनेची पुनर्घटना करण्यात येणार आहे. खाणींच्या कामाची पद्धत, खनिजांचा शोध आणि कारभाराची यंत्रणा ह्या सर्वच बाबतीत पुनर्घटना करण्याची गरज भासत आहे. तांब्याच्या खाणींचा शोध करून तांब्यापासून मिळू शकणाऱ्या उपपदार्थांचे उत्पादन करण्यासाठी एक योजना नियोजन समितीकडे पाठविण्यात आली आहे. योजना अमलात आणण्यासाठी ९० कोटी रुपयांचा खर्च येईल. तांब्याचे खनिज भारताला बऱ्याच प्रमाणात आयात करावे लागते.

### यूनिटवर ७% डिव्हिडंड

यूनिट ट्रस्ट ऑफ इंडियाने ३० जून, १९६६ अखेरच्या वर्षासाठी ७·०% डिव्हिडंड जाहीर केले आहे. १,००० रु. पर्यंतच्या डिव्हिडंडच्या उत्पन्नावर प्राप्तिकर माफ असल्याने व्यक्तींना उत्पन्नाचा दर ८·९७% पडतो.


## महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि.
## मुंबई

( दि विदर्भ सहकारी बँक लि., सम्मीलित )

: मुख्य कचेरी : — ९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई. टेलिफोन नं. २५५४७४–७५, २५६२१४, २५४७८१

: विभागीय कचेरी : — महाल : नागपूर. तारेचा पत्ता : फार्मर बँक

| | | |
|---|---|---|
| भरपाई झालेले भांडवल | ... रु. | ५,६५,६६,००० |
| गंगाजळी व फंड | ... रु. | १,७५,५५,००० |
| ठेवी | ... रु. | ४३,८६,६३,००० |
| खेळते भांडवल | ... रु. | १,००,८६,८१,००० |

: शाखा :

( १ ) भायखळा ( २ ) गोरेगाव ( ३ ) खार ( ४ ) लालबाग ( ५ ) प्रभादेवी ( ६ ) विलेपार्ले (पूर्व) ( ७ ) सांताक्रूझ (८) मुलुंड (९) चेंबूर (१०) माहीम (११) शीव (१२) माटुंगा (१३) अंधेरी (१४) विलेपार्ले (पश्चिम) (१५) सिताबर्डी (१६) धरमपेठ (१७) धन्तोली (१८) सदर बझार.


ह्या बँकेत गुंतविलेला पैसा शेतकरीवर्ग, सहकारी लहान उद्योगधंदे व सहकारी साखर कारखाने यांच्याच उपयोगासाठी दिला जातो. सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

डॉ. वा. चु. श्रीश्रीमाळ, मॅनेजर. श्री. वि. म. जोगळेकर, जनरल मॅनेजर.



महाराष्ट्र सरकारने तगाईवर मंजूर केलेले "विजय" नांगर

वापरा. ४, ६ व ८ बैली फाळ व सुटे भाग



तसेच विजय सेंट्रिफ्युगल पंप्स्




१" ते ४" बेल्ट ड्राइव्ह व डायरेक्टर कपल्ड, शिवाय

बोअरिंगचे हँड पंप्स्, हँड रहाट, इ. इ.

## – न्यू विजय इंडस्ट्रीज लि. –

विश्रामबाग – सांगली ( महाराष्ट्र )



श्री. वा. काळे ह्यांची

कौटुंबिक व सामाजिक जीवनावरील पुस्तकें

## १ कण आणि क्षण, २ पुढें पाऊल, ३ तुमचें स्थान कोणतें ?

## १४ प्रमुख बँका

### गेल्या १० वर्षांतील प्रगती

५० कोटी रु. पेक्षा जास्त ठेवी असलेल्या ( सरकारी स्टेट बँक धरून ) १४ बँकांचे आकडे पाहिले, तर त्यांचेकडील ठेवी गेल्या दहा वर्षांत ७४९ कोटी रुपयांच्या २,४७३ कोटी रुपयांवर गेल्या. स्टेट बँकेकडील ठेवी २२६ कोटी रु. च्या ७३५ कोटी रु. वर गेल्या. सेंट्रल बँकेने आपला दुसरा आणि पंजाब नॅशनल बँकेने आपला तिसरा अनुक्रम कायम राखला. ह्या दोन्ही बँकांच्या ठेववाढीची गती मात्र इतर सर्व बँकांपेक्षा कमी होती. ५० कोटी रुपयांपेक्षा जास्त ठेवी असणाऱ्या फक्त ४ बँका १९५५ मध्ये होत्या; १९६५ मध्ये अशा बँकांची संख्या १४ झाली आहे.

१९५५ मध्ये शेड्यूल्ड बँकांच्या शाखांची संख्या २,७९१ होती; १९६५ अखेर ती ५,७०० झाली. म्हणजे, दहा वर्षांत ती दुपटीहून अधिक झाली.

शाखासंख्येच्या क्रमवारीत, पहिल्या तीन बँकांचा क्रम बदललेला नाही—स्टेट बँक ऑफ इंडिया, दि पंजाब नॅशनल बँक आणि सेंट्रल बँक. इंडियन बँकेचा ४ था अनुक्रम बँक ऑफ बरोडाने घेतला आहे. युनायटेड कमर्शिअलचा ५ वा अनुक्रम होता, तो कॅनरा बँकेने पटकावला आहे.

जुलै १९५६ मध्ये, राष्ट्रीयीकरणाचे वेळी, स्टेट बँकेच्या फक्त ४७७ शाखा होत्या. १९६५ अखेर त्यांची संख्या १,२७६ झाली. सबसिडिअरी बँकांच्या ६५८ शाखा त्यात मिळवल्या, तर एकूण संख्या १,९३४ होते. भारतातील एकूण बँक कचेऱ्यांच्या तिसरा हिस्सा हा आकडा आहे. १९५७ ते १९६४ ह्या काळात स्टेट बँकेने ४५० नव्या शाखा उघडल्या, त्यासाठी रिझर्व्ह बँकेने तिला १३२.७१ लक्ष रु. ची, म्हणजे प्रत्येक शाखेस २९,००० रु. ची, मदत केली. बिनसरकारी बँकांना नव्या शाखा उघडण्यासाठी येणारा खर्च स्वतःच्या नफ्यातून भागवावा लागतो. तरी त्यांनी दरसाल २०० शाखा उघडल्या.

| | प्रमुख १४ बँकांच्या कचेऱ्या | | | प्रमुख १४ बँकांच्या ठेवी ( आकडे लक्ष रु. ) | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | १९५५ | १९६० | १९६५ | १९५५ | १९६० | १९६५ |
| अलाहाबाद बँक | ८५ (७) | ८८ (१०) | १०५ (१४) | ३४·८७ (७) | ५०·८० (८) | ८४·१३ (९) |
| बँक ऑफ बरोडा | ६१ (९) | १०१ (८) | २५२ (४) | ४०·५२ (६) | ८४·९६ (६) | १८६·०३ (५) |
| बँक ऑफ इंडिया | ४८ (१२) | ६४ (१३) | १६५ (९) | ६४·७४ (४) | १०६·३३ (४) | २४०·४३ (४) |
| कॅनरा बँक | ५१ (१०) | ८४ (११) | २३९ (५) | १८·९८ (१२) | २९·९० (११) | ९८·९८ (८) |
| सेंट्रल बँक | ३०४ (३) | ३१८ (३) | ४१३ (३) | १२७·०८ (२) | १९५·६२ (२) | ३१६·३६ (२) |
| देना बँक | ६२ (८) | ९६ (९) | १५३ (१०) | १६·०८ (१०) | ३५·०८ (१०) | ८१·५७ (१०) |
| इंडियन बँक | १०१ (४) | १४२ (५) | १६६ (८) | २९·२८ (९) | ३९·४८ (९) | ५८·३५ (१३) |
| इं. ओव्हरसीज बँक | ४९ (११) | ६९ (१२) | १२७ (१३) | १४·१८ (११) | २८·३० (१२) | ५४·१६ (१४) |
| पंजाब नॅ. बँक | ३२७ (२) | ४०८ (२) | ४६६ (२) | ९०·१२ (३) | १३८·१४ (३) | २४०·५२ (३) |
| स्टेट बँक | ४९७ (१) | ९०७ (१) | १२७६ (१) | २५५·७७ (१) | ५७१·३२ (१) | ७३५·१२ (१) |
| सिंडिकेट बँक | ९४ (६) | १४० (६) | २०६ (७) | ६·६७ (१४) | १८·८७ (१४) | ५९·११ (१२) |
| युनियन बँक | १४ (१३) | ५३ (१४) | १३७ (१२) | ९·०४ (१३) | २८·१३ (१३) | ६९·३२ (११) |
| युनायटेड बँक | ९५ (५) | १११ (७) | १३८ (११) | ३१·२१ (२) | ५१·१९ (७) | १०२·८३ (७) |
| युनायटेड क. बँक | ९५ (५) | १४३ (४) | २२३ (६) | ४७·६९ (५) | ८५·५८ (५) | १४६·३९ (६) |
| | १,८८४ | २,७२४ | ४,००६ | ४४९·२७ | १,४६३·७० | २,४७३·३० |

कंसातील आकडा त्या त्या वर्षांतील बँकेचा अनुक्रम दर्शवितो.

**साखर तंत्रज्ञांचा अभ्यासक्रम**—कोल्हापूर येथील सरकारी विविध उद्देशीय तांत्रिक शिक्षण संस्थेत साखरेच्या तंत्रज्ञांचा एक अभ्यासक्रम चालू वर्षापासून सुरू करण्यात येणार आहे. शिवाजी विद्यापीठाच्या कक्षेत असणाऱ्या पाच जिल्ह्यांतील विद्यार्थ्यांसाठी एकूण जागांपैकी ५० टक्के जागा राखून ठेवण्यात येणार आहेत. साखरेच्या धंद्याचा विकास करण्याचे सरकारी धोरण असल्यामुळे तंत्रज्ञांची वाढती गरज आहे.

**हिंदी रुपये घेण्यास नकार**—भारतात आलेल्या परदेशीय नागरिकांना परत जाताना आपल्या मालकीच्या मोटारी स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशनला विकाव्या लागतात किंवा त्यांची निर्यात करावी लागते. त्यांच्या गाड्या विकण्यात रुपयाच्या अवमूल्यनामुळे अडचण निर्माण झाली आहे. काही परदेशीय नागरिकांनी गाड्यांची किंमत रुपयात घेण्याचे नाकारल्याची उदाहरणे घडली आहेत.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## गुजरात स्टेट ट्रॅन्सपोर्ट कॉर्पोरेशनचे कर्ज

गुजरात राज्याच्या स्टेट रोड ट्रॅन्सपोर्ट कॉर्पोरेशनने येत्या ऑक्टोबर महिन्यात १ कोटी रुपयांचे सार्वजनिक कर्ज उभारावयाचे ठरविले आहे. चौथ्या पंचवार्षिक योजनेत संघटनेच्या विस्तार करण्याच्या कामासाठी कर्जाचा विनियोग करण्यात येणार आहे. सार्वजनिक कर्ज उभारण्याचा कॉर्पोरेशनचा हा पहिलाच प्रसंग आहे. राज्य सरकारने कर्जाविषयी हमी घेण्याचे ठरविले आहे. गुजरात रस्ता वाहतूक संघटनेने वाहतुकीचे राष्ट्रीयीकरण जवळजवळ पूर्ण केले आहे. प्रवाश्यांना सुखसोई देणे, वर्कशॉप्सचा विस्तार करणे आणि अधिक कार्यक्षम बनणे असे हेतु संघटनेपुढे आहेत. कॉर्पोरेशनने आखलेल्या कार्यक्रमाप्रमाणे गाड्यांच्या संख्येत भर घालण्यात येईल. सुमारे ४,५०० गाड्या दरसाल ४० लाख उतारूंची ने-आण करतील. सध्या संघटनेचे उत्पन्न १८ कोटी रुपये आहे, ते २५ कोटींपर्यंत वाढेल असा अंदाज आहे.

## "नो बर्थ बोनस"

कुटुंबनियोजनाला उत्तेजन म्हणून कारखानदारांनी ज्या स्त्री-कामगारांना पांच वर्षे मूल झाले नाही किंवा ज्यांना दोन किंवा तीन अपत्ये आहेत अशांना "नो बर्थ बोनस" द्यावा, अशी मध्यवर्ती आरोग्यमंत्री डॉ. सुशिला नायर ह्यांनी सूचना केली आहे.

## पोस्टकार्डे, पाकिटे विकण्याची दुकानदारांना परवानगी

मुंबई, कलकत्ता आणि दिल्ली येथे काही व्यापारी, हॉटेलवाले, ट्रॅव्हल एजंटस, ह्यांना पोस्टाची कार्डे, पाकिटे, तिकिटे विकण्यास परवानगी देण्याचे पोस्ट खात्याने प्रयोगादाखल ठरविले आहे. संध्याकाळी पोस्टातून ह्या स्टेशनरीच्या खरेदीसाठी गर्दी होते, त्यावरील ही उपाययोजना आहे. १०,००० लोकवस्तीत एकाला परवाना दिला जाईल आणि त्याला एक टक्का कमिशन मिळेल.

## सिक्किममधील पहिलेच वृत्तपत्र

सिक्किममधील पहिलेच वृत्तपत्र, "सिक्किमी" हे पाक्षिक ६ जुलैपासून सुरू झाले. सिक्किममध्ये काढलेल्या पहिल्याच खाजगी छापखान्यात हे छापले जाते. सिक्किममध्ये आणखी दोन छापखाने आहेत, त्यापैकी एक भारत सरकारचा व एक सिक्किम दरबारचा आहे.

## दार्जिलिंग चहा किलोला १३१ रुपये

मेसर्स मेरीबाँग अँड कील टी एस्टेटने ब्रुक बाँड इंडिया लिमिटेडचे दलाल, मेसर्स कॅरिट मोरन अँड कंपनीला गेल्या आठवड्यात किलोस १३१ रुपये ह्या दराने दार्जिलिंग चहा विकला. चहाच्या किमतीचा हा उच्चांक आहे. चहा निर्गत करणारांच्या प्रतिष्ठावर्धक मोहिमेचा तो परिणाम आहे.





बँक ऑफ महाराष्ट्र
लिमिटेड

आपल्या १०० हून अधिक शाखाद्वारे आपली सर्व तऱ्हेची सेवा करण्यांस तत्पर आहे.

रजिस्टर्ड ऑफिसः ११७७ बुधवार पेठ, पुणे-२.


हे पत्र पुणे पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले.